Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# मानवता, शांती, विकास आणि उन्नतीसाठी वसुधैव कुटुम्बकम

**प्रा.दीपाली आतिश सोसे**
सिताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

"वसुधैव कुटुम्बकम " हा असा मानवी विचार आहे, जो संपूर्ण सृष्टीला दिशा देणारा आहे. मूलतः " वसुधैव कुटुंबकम" हा एक संस्कृत शब्द आहे, याचा अर्थ संपूर्ण जग एक परिवार असून सगळ्यांनी एक दुसऱ्यांच्या सोबत प्रेम आणि सहकार्यांच्या भावनेने वागले पाहिजे. त्यामुळे सृष्टीतील सर्व जीवांची सुरक्षा आणि सेवा करणे गरजेचे आहे. हा मानवाचे सर्वांगीण हित जपणारा अतिशय परिपक्व विचार आहे. ' वसुधैव कुटुम्बकम ' या महान विचाराने आपल्याला विश्वबंधुत्व, मानवता, शांतता, सहकार्य आणि सामंजस्याची शिकवण दिली आहे. व्यक्तीने स्वतःचा, स्वतःच्या स्वार्थाचा विचार न करता त्यापलीकडे जाऊन वसुधैव कुटुम्बकम या विचाराने मार्गक्रमन करणे गरजेचे आहे. एक अशा विश्वाची निर्मिती ज्या विश्वाद्वारे सामाजिक समानता, जैवविविधतेचे संगोपन, परस्परांना सहकार्य करणे, प्रेरणा देणे, परस्परांना सोबत घेऊन सर्वांचा सर्वांगीण विकास करणे आवश्यक आहे. वसुधैव कुटुम्बकम हा मानवी जीवनाला विश्व कल्याणचा संदेश देणारा एक अत्यंत प्रभावी विचार आहे. सूक्ष्म अति सूक्ष्म सर्वांचाच सर्वांगीण विकास व्हावा, कोणीही विकासाच्या प्रवाहात मागे पडता कामा नये. माणुसकी जपत एकट्याचा नव्हे तर सर्वांच्या सुखाचा विचार करीत माणसाला माणुसकीने जगण्याची शिकवण देणारा हा महानमंत्र आहे. स्वतःच्या वैयक्तिक हितसंबंधापेक्षा सामाजिक आणि राष्ट्रीय हित अधिक महत्त्वाचे आहे. पृथ्वी एक परिवार आहे असे समजून वर्तन करणे. वसुधैव कुटुम्बकम यामध्ये सार्वभौमित्ता, एकता आणि विश्व प्रेमाच्या भावनेचा अंतर्भाव होतो. लीलाधर हेगडे अतिशय मार्मिक शब्दांमध्ये लिहितात की,

मानव तितुका एकच आहे,
उच्च न कोणी नीच न कोणी,
हाच आमुचा धर्म खरोखर,
हीच आमुची शाश्वतवाणी.

हेगडे यांच्या विचारानुसार सर्व मनुष्य समान आहेत. त्यांच्यात कोणताच भेदभाव नसून आणि उच्च नीच भेदभाव करणे हे सर्वथा चुकीचे आहे. मानवता हाच आपला धर्म असून मानवतेने जगण्याची ग्वाही देणे हीच आमची वाणी आहे. हाच विचार वसुधैव कुटुम्बकम यामध्ये सुद्धा अभिप्रेत आहे.

**उद्देश:---**

वसुधैव कुटुम्बकममध्ये अभिप्रेत मानवतेचा विचार

वसुधैव कुटुम्बकम मध्ये अभिप्रेत शांततेचा विचार

3. देशाच्या विकास आणि उन्नती करिता वसुधैव कुटुंबकमची गरज

आधुनिक काळात वसुधैव कुटुम्बकमची आवश्यकता आहे का?

## वसुधैव कुटुंबकम मध्ये अभिप्रेत मानवतेचा विचार

मानवी जीवनात सर्वांना सुख, समाधान, शांतीची अपेक्षा असते. सुख आणि समाधानाची लकेर मानवता व शांततेच्या मार्गाने

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जाते. सर्वांना आनंद. देणारा सर्वांचा विचार करणारा, सर्वांप्रती सहनभूती आणि संवेदना करणारा हा एक महान विचार आहे. कवी समीर सावंत म्हणतात की, ' माणसाने माणसाशी माणसासम वागणे '. ही मानवी जीवनाची अत्यावश्यक गरज आहे. आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात की,

जे का रंजले गांजले,
त्यासी म्हणे जो आपुले,
तोचि साधू ओळखावा,
देव तेथेचि जाणावा

आपल्या देशातील साधू, संत, महात्मे, समाज सुधारक या सर्वांनीच मानवतावादी विचारांचा पाठपुरावा केला आहे. मानवता म्हणजे माणुसकी आणि हीच विचारधारा सर्व विचारांचा कळस आहे. मानवतावादी विचारांमध्ये सर्वांना समानतेची वागणूक मिळणे आवश्यक असते. मानवतावादी विचारांमध्ये एक चांगला विचार दडला आहे ज्यामध्ये स्वतःमधील दोष दूर करून आणि चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करणे. तो चांगुलपणा कायम टिकवणे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या एका अभंगात म्हणतात की,

माणूस द्या मज माणूस द्या,
ही भीक मागता प्रभू दिसला.

माणसातील दोष दूर करून त्याची जडणघडण करायची असेल तर त्याला सत्य, प्रेम, करुणा, बंधुभावाच्या मार्गाने जाणे अपेक्षित आहे. मानवी जीवनाला दिशादर्शक ठरणारा हा विचार आपल्या सोबत इतरांची ही चांगले व्हावे ही भावना माणसाला सर्वोच्च पातळीवर नेणारी भावना आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, "आज आपल्याला माणूस घडवणाऱ्या धर्माची आवश्यकता आहे. आज आपल्याला माणूस बनविणाऱ्या सिद्धांताची गरज आहे. आज आपल्याला सर्व क्षेत्रात माणूस निर्माण करणारे शिक्षण हवे आहे." म्हणूनच माणसाने माणुसकी जपत जगणे अतिशय गरजेचे आहे. तोच मानवतेचा पाया आहे, सर्व थोर विचारवंत, संत, कवी, महात्मे, यांनी मानवतेला मुलाधार मानले आहे. अनेक महान ग्रंथांमध्ये आपल्याला मानवतेचा विचार जपत समोर जाण्याचा संदेश दिला आहे. भगवान गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, महात्मा बसवेश्वर, महात्मा गांधी, महान ग्रंथ, महाकाव्य या सर्वांनी आपल्याला समाजामध्ये समानतेने आणि मानवतेने जीवन जगण्याचा संदेश दिला आहे. मानवता ही केवळ कागदोपत्री माणसाची गरज नसून मानवतेच्या माध्यमाने प्रत्येकाला त्याच्या प्रात्यक्षिक आयुष्यामध्ये मानवतेने जीवन जगत समोर जाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी जगा आणि जगू द्या या न्यायाप्रमाणे विचार करत जगणे गरजेचे आहे. आपण राहतो त्या समुदायात आपल्याला एकमेकांच्या मदतीची गरज असते आणि या गरजेमधूनच आपण परस्परांना मदतही करीत असतो यातून एक परिपक्व संघटन निर्माण होते. मनुष्य प्राणी परस्परांवर अवलंबून असणारा प्राणी आहे. एकमेकांच्या सोबती मधूनच परस्परच सहाय्याने पुढे जात यशोशिखरावर जाणारा मनुष्य हाच खरा यशस्वी मनुष्य असतो. मानवता जपणे हाच वसुधैव कुटुम्बकम चा धर्म आहे. वसुधैव कुटुम्बकम च्या प्रवासातील एक महत्त्वाचा परिपूर्ण टप्पा म्हणजे मानवता होय. वसंत बापट अतिशय मार्मिक शब्दांमध्ये मानवतेबाबत लिहितात की,

भेद सारे मावळू द्या, वैर, साऱ्या वासना,
मानवाच्या एकतेची पूर्ण होऊ कल्पना,
मुक्त आम्ही, फक्त मानु बंधूतेच्या बंधना
सत्य- सुंदर - मंगलाची नित्य ही आराधना.

## वसुधैव कुटुम्बकम मध्ये अभिप्रेत शांततेचा विचार

सर्व धर्मग्रंथांनी समाजाला शांततेचा संदेश दिला. समाजात समानता आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी अतोनात

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

प्रयत्न केले. समाजाला दया, प्रेम, शांतीचा संदेश देत सद्भावनेणे जगण्याचा संदेश दिला. महात्मा गांधीजींनी जगाला शांततेचा संदेश दिला. महात्मा गांधीजी कायम म्हणत असत की, " शांतीचा कोणताही मार्ग नाही तर शांती हाच मार्ग आहे. "( There is no way to Piece peace is the way ) शांतता ही वसुधैव कुटुंबकम मधील एक महत्त्वाचा घटक आहे. संपूर्ण जग एक कुटुंब आहे असं मानून त्यानुसार वागणारा समाज जेव्हा निर्माण होतो तेव्हा खऱ्या अर्थाने जगात शांतता प्रस्थापित होते. जात, धर्म, पंथाच्या विचार पलीकडे जाऊन एकमेकांप्रती स्नेह आपुलकी, क्षमा, दया, करुणेचा संदेश दिला जातो, त्या वेळेला खऱ्या अर्थाने शांततेचा झरा वाहू लागतो. जगातील सर्व लोक हे एकाच कुटुंबाचे सदस्य असून आपापसातील भिन्नता विसरून शांततेने जीवन जगणे हा खरा धर्म आहे. प्रत्येक व्यक्तीचा आदर करणे, संघर्ष टाळून परस्परांमध्ये शांतता प्रस्थापित करणे, उदारतेच्या भावनेने जीवन उन्नत करणे, मी आणि माझे असा विचार न करता आम्ही आणि आपले असा विचार समोर ठेवणे , एकमेकांप्रती सहकार्याची जाणीव निर्माण करणे, शाश्वत विकासाला चालना देणे, आणि सहृदयतेच्या भावनेने समाजात शांतता निर्माण करणे हे मानवी समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. याच गोष्टी वसुधैव कुटुम्बकम या विचारांमध्ये आलेल्या असल्याकारणाने शांततेने जीवन जगण्याचा संदेश वसुदेव कुटुंबकमच्या माध्यमातून दिला जातो असं म्हणायला निश्चितच काही हरकत नाही. तेव्हा मानव नव्हे तर निसर्गप्रती सुद्धा आपले कर्तव्य असून त्याचे जतन - संवर्धन ही सुद्धा आपली महत्त्वाची जबाबदारी आहे. उज्वल समाजाच्या निर्मिती करिता राष्ट्रात शांतता प्रस्थापित होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. समानतेच्या मार्गाने वाटचाल करीत समुदायाचे हित जपत जगणे अत्यावश्यक आहे. मानव जीवनातील संघर्ष कमी करून शांतता प्रस्थापित करण्याकरिता वसुधैव कुटुंबकम या विचाराची गरज आहे. शांतता म्हणजे केवळ युद्ध टाळणे असे नसून समाजातील प्रत्येकाला त्याच्या आयुष्यात शांतता अपेक्षित असते. शांततेचा मार्ग अवलंबणारे आणि शांततेसाठी सातत्याने प्रयत्न करणारे अनेक महान व्यक्तिमत्व आहेत. शांतता समाजात समानतेचे द्वार खुले करते. मन स्थिर स्थावर करून जागतिक शांतता प्रस्थापित करण्याकरिता व्यक्ती, समूह आणि समुदायामध्ये शांततेची भावना निर्माण करण्याचे श्रेय वसुधैव कुटुम्बकम या तत्वाला देणे गरजेचे आहे. संघर्ष टाळून प्रेम, सहिष्णुता आणि सद्भावना निर्माण करणे. तसेच सर्वसमावेशक अशा सर्वव्यापी विचारांना प्रेरणा देणे हे सुद्धा शांततेमध्ये अभिप्रेत आहे. आणि तोच विचार वसुधैव कुटुम्बकम या विचारांच्या माध्यमातून दिला आहे. महात्मा ज्योतिबा फुले आपल्या अखंड या ग्रंथात म्हणतात की, ' " जगाच्या कल्याणा देह कष्ट वावा" ' समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा महात्मा फुले आपल्या सगळ्यांना देतात. अनंत खांडेकर म्हणतात, " स्वतःसाठी जगलास तर मेलास दुसऱ्यासाठी जगलास तर खरा जगलास." दुसऱ्याला आनंद देण्यासाठी स्वतःचे अस्तित्व संपवून घेणारी ही मेणबत्ती आपल्याला अत्यंत उदात्तेचा संदेश देते.

## देशाच्या उन्नती आणि विकासाकरता वसुधैव कुटुंबकम

उपनिषदेमध्ये एक महत्त्वाचा श्लोक दिलेला आहे. प्रामुख्याने अथर्ववेदामध्ये समाविष्ट असणारा हा विचार अतिशय महत्त्वाचा एकतेचा विचार आहे. सर्वांगीण विकासाकरीता दिलेला हा संदेश सर्वव्यापी संदेश आहे. जग हे केवळ अनोळखी अगम्य लोकांमध्ये विभागले नसून जग हे संपूर्ण कुटुंब आहे.

अम नीज: परो वेति गणना लघुचेतसाम ।

उदारचरितानं तु वसुधैव कुटुंबकम।

या श्लोकाने व्यापक आणि मोलाचा संदेश दिलेला आहे. स्वतःच्या संसारिक सुखाचा त्याग करून उदारमतवादी वृत्ती विकसित करण्याचा दृष्टिकोन दिलेला आहे. भारत एक विकसनशील राष्ट्र महान राष्ट्र आहे. वैश्विक दृष्टिकोनातून पाहता सामाजिक मूल्याच्या आणि त्याच्या संवर्धनाचा विचार करत असताना आदर्शवाद आणि जागतिक घडामोडीच्या वास्तविकतेचे भान ठेवून वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेची जपवणूक करणे हे भारताच्या उन्नती आणि विकासाकरिता अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या व्यापक दृष्टिकोनानुसार जग एक कुटुंब आहे हे समजून त्याच्या सर्वांगीण विकासाकरता आणि उन्नती करिता

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

सर्वांनी संघटन करून विकास करणे क्रमप्राप्त आहे. सहानुभूती आणि सदाचाराचा विचार समोर ठेवून नैतिक मूल्याचे जतन, संवर्धन, संगोपन करीत राष्ट्राचा विकास वेगवान व गतिमान करणे सर्वांगीण हितासाठी आवश्यक आहे. जागतिक दृष्टिकोनातून वसुधैव कुटुम्बकम ही अत्यंत उपयोगी आणि महत्त्वपूर्ण असा विचार आहे. त्यानुसार वागणे हे आपले कर्तव्य आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की,

या भारतात बंधुभाव नित्य असू दे,
दे वरची असा दे,
हे सर्व पंत संप्रदाय एक दिसु दे,
मतभेद नसु दे
नांदोत सुखे गरीब अमीर एकमताने,
मग हिंदू असो क ख्रिश्चन वा हो इस्लामी,
स्वातंत्र्य सुखा या सकला माझी वसु दे,
देवाची असा दे

## समारोप

भारतीय संस्कृतीमध्ये समुदायिक प्रार्थनेला अत्यंत महत्त्व आहे. प्रार्थना ही सामुदायिक प्रार्थना असते, ती फक्त स्वतःच्या वैयक्तिक हिताकरिता नसून समुदायासाठी प्रार्थना केली जाते. याशिवाय वसुदेव कुटुंबकम या संस्कृत मधील श्लोकाचा उपयोग अनेक महत्त्वपूर्ण ठिकाणी करण्यात आला आहे. तसेच 2013 साली मैसूर येथे झालेल्या सातव्या आंतरराष्ट्रीय पृथ्वी विज्ञान ओलंपियाडच्या लोगो मध्ये वसुधैव कुटुंबकम या सर्वव्यापी संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला होता. आणि हे डिझाईन बंगलोर विद्यापीठाच्या आर शंकर आणि श्वेता बी शेट्टी यांनी निर्माण केले होते. 2023 मध्ये G 20 च्या शिखर परिषदेत एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एक भविष्य असा विचार करण्यात आला होता. वसुधैव कुटुम्बकम या संकल्पनेचा स्वीकार करण्यात आला. विकसितच नव्हे तर आफ्रिका आणि आशिया खंडातील पर्यावरण रक्षण आणि विकासा करिता त्याच्या संवर्धनाकरिता या सगळ्यांचा सहभाग या परिषदेमध्ये घेण्यात आला होता. भारतीय संसदेसमोर सुद्धा वसुधैव कुटुंबकम हा विचार लिहिण्यात आलेला आहे. भारतातच नव्हे तर इंडोनेशियात बाली या द्वीपावर एका शिलालेखामध्ये वसुधैव कुटुंबकम हा विचार लिहिलेला आहे. वसुधैव कुटुम्बकम ही सर्वव्यापी जगाव्यापी संकल्पना आहे आणि ती मान्य करणे गरजेचे आहे.